# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# ग प्रभाग कार्यालय
# कार्यपत्रिका क्रमांक - ७
# सभावृत्तांत

दिनांक - १/१०/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०१/१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे
३. मा.पवार मनिषा प्रमोद
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
६. मा.भोसले सचिन सुरेश
७. मा.सविता बाळकृष्ण खुळे
८. मा.चंद्रकांत बारकु नखाते
९. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१०. मा.विनोद हनुमंत तापकिर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्री.आर.बी.जगताप – प्रशासन अधिकारी, श्री. ए के सुपे- लेखा अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.आर.के.जावळे – उप अभियंता जलनि:सारण, श्री.बाबासाहेब गलबले – कार्यकारी अभियंता,विद्युत, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्री.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.इनामदार एस जी. – मुख्य आरोग्य निरीक्षक,श्री.मगर एस एम – किनष्ठ अभियंता, जलनि:सारण, श्री.मगर ए ए – क्रीडा पर्यवेक्षक, श्री.मोमीन ए. ए , श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी,श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ

अभियंता स्थापत्य, श्री.गणेश राऊत - कनिष्ठ अभियंता, विद्युत, श्री.जी एन खैरे – सहा.उद्यान निरीक्षक, श्री.बी के तापकिर – वृक्षसंवर्धन, श्री.सरवदे - अतिक्रमण अधिक्षक इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. ३/९/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. ६) कायम करणेत येत आहे.

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - १
दिनांक- १/१०/२०१८
सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.निकीता कदम यांचे दि.०३/०९/२०१८ चे पत्र.

मा.निकीता कदम यांचे दिनांक ३/०९/२०१८ चे पत्रानुसार मा.ग प्रभाग समिती ठराव क्र.१५ दि.०४/०६/२०१८ अन्वये प्रभाग क्र.२१ मधील डिलक्स चौक ते जमतानी चौक या रस्त्यास 'माजी प्राचार्य श्री भगवानदास कोडोमाल खिलानी मार्ग' असे नामकरण करणेत यावे असा ठराव मान्य झालेला आहे, तरी सदरचा ठराव 'माजी प्राचार्य श्री भगवानदास कोडोमाल खिलानी मार्ग' असा न वाचता 'माजी प्राचार्य बी.एफ.खिलनानी सर मार्ग' असा वाचणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - २
दिनांक- १/१०/२०१८
सूचक- मा.मनिषा पवार अनुमोदक- मा.सविता खुळे
संदर्भ – मा.नगरसचिव यांचेकडील पत्र क्र.नस/०४/कावि/६२२/२०१८ दिनांक २१/०९/२०१८ चे पत्र

मा.नगरसचिव यांचेकडील पत्र क्र.नस/०४/कावि/६२२/२०१८ दिनांक २१/०९/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मा.प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य यांना पुरविण्यात येणा-या सुविधांपैकी आयडेंटिटी कार्ड, व्हिजिटींग कार्ड, शिफारस पत्र, लेटरपॅड इ. सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(सदर विषयाबाबत नगरसचिव विभागाकडुन माहिती मागवणेत यावी.)

सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - ३

दिनांक- १/१०/२०१८

सूचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.सचिन भोसले

**संदर्भ** – मा. ग क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.गक्षे/०२/कावि/५११/२०१८ दिनांक १८/०९/२०१८ चे पत्र

मा.क्षेत्रिय अधिकारी ग प्रभाग यांचे पत्र क्र.गक्षे/०२/कावि/५११/२०१८ दिनांक १८/०९/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील एकुण ६४४ फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण झालेले आहे. त्यापैकी बायोमॅट्रिक झालेल्या फेरीवाल्यांची संख्या २८४ इतकी आहे. बायोमॅट्रिक झालेल्या फेरीवाल्यांपैकी २०६ फेरीवाल्यांना फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे. ज्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे, त्यांना जागा निश्चीत करणे आवश्यक आहे.

याबाबत हॉकर्स झोन पुन:स्थापित करणेसाठी क्षेत्रिय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करणेबाबत दि.२७/३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेमध्ये मा.आयुक्त यांनी सुचविल्यानुसार हॉकर्स झोन तयार करणेसाठी केंद्र व राज्यशासन यांचे नियम व मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार प्रभाग स्तरावर एक उपसमिती स्थापन करण्यात येत आहे. ती खालीलप्रमाणे –

प्रभाग हॉकर्स झोन फेरीवाला उपसमिती

१) श्रीम.स्मिता झगडे – अध्यक्ष – क्षेत्रिय अधिकारी, ग क्षेत्रिय कार्यालय

२) श्री.देवन्ना गट्टुवार – सदस्य – कार्यकारी अभियंता, स्थापत्य, ग क्षेत्रिय कार्यालय

३) श्री.सुनिल भागवानी – सदस्य - उपअभियंता नगररचना विभाग

४) श्री.सतिष माने – सदस्य – वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाकड

५) श्री.एस एस घोळवे – सदस्य वाहतुक पोलिस निरीक्षक, वाकड

६) श्री.किशोर म्हसवडे – सदस्य वाहतुक पोलिस निरीक्षक,पिंपरी

७) श्री.हनुमंत रोकडोबा सरवदे – सदस्य अतिक्रमण निरीक्षक,अतिक्रमण विभाग (स्थापत्य)

८) श्री.एफ डी ए प्रतिनिधी (food & drug administration) (अन्न सुरक्षा प्रशासन)

९) फेरीवाला संघटनेचे सदस्य

    १) श्री. शंकर शिनगारे – घर क्र.४२१/२ ज्योतिबा नगर काळेवाडी पुणे १७

    २) श्री.निलेश राजेंद्र जाधव – यशोदा कॉलनी, रहाटणी फाटा, पुणे १७

    ३) श्री.अमित कुदळे – पिंपरी पुणे १७

सबब उपरोक्त प्रमाणे नियुक्त केलेल्या समितीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर नियोजित समिती बरखास्त करुन नवीन समिती नेमणेत यावी असे सांगुन सर्वानुमते सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - ४

दिनांक- १/१०/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.सविता खुळे

संदर्भ – मा.प्रशासन अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांचे जा.क्र.गक्षेका/प्रशा/०४/कावि/७३/२०१८ दिनांक १/१०/२०१८ चे पत्र

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीस "**सिंधुदुर्ग प्रभाग समिती**" व ग क्षेत्रिय कार्यालयास "**सिंधुदुर्ग क्षेत्रिय कार्यालय**" असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक - ५

दिनांक- १/१०/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.सचिन भोसले यांचे दिनांक १/१०/२०१८ चे पत्र

मा.सचिन भोसले यांचे दिनांक १/१०/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२४ येथील गुजरवस्ती गव्हाणे हॉस्पिटलच्या मागील कॉलनीला आजतागायत नाव देयात आलेले नाही, सदरील लोकवस्ती हि खुप पुर्वीची व जुनी असुन तिचे नामकरण करणे गरजेचे आहे. या परिसरातील नागरीकांना पत्र व्यवहार करण्यात देखील अडचणी येत आहेत , तरी या कॉलनीला "**श्री**" कॉलनी असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - ६

दिनांक- १/१०/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.सविता खुळे

संदर्भ – मा.सचिन भोसले यांचे दिनांक १/१०/२०१८ चे पत्र

मा.सचिन भोसले यांचे दिनांक १/१०/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२४ येथील मातोश्री कॉलनीच्या मागील कॉलनीला आजतागायत नाव देण्यात आलेले नाही सदरील लोकवस्ती हि खुप पुर्वीची व जुनी असून तिचे नामकरण करणे गरजेचे आहे. या परिसरातील नागरिकांना पत्र व्यवहार करण्यात देखील अडचणी येत आहेत. तरी या कॉलनीला "**पंचमुखी कॉलनी**" असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**दि. १/१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

मा.अध्यक्ष श्री.बाबासाहेब त्रिभुवन यांचे अनुमतीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** दिनांक ३/०९/२०१८ रोजीचा सभावृत्तांत क्र. ६ कायम करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मा.प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य यांना पुरविण्यात येणा-या सुविधांबाबत नगरसचिव विभागाकडुन माहिती घेण्यात यावी.

**मा.सचिन भोसले -** हॉकर्स झोन पुन:स्थापित करणेसाठी क्षेत्रिय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जी उपसमिती स्थापन करणेत आली आहे, ती आम्हा सदस्यांना मान्य नाही, सदर समिती हि सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन करण्यात यावी. यासाठी विषय क्रमांक ३ मधील समिती बरखास्त करुन नवीन समिती नेमण्यात यावी.

**मा.संदिप गाडे -** याचबरोबर अनधिकृत फ्लेक्स/बॅनर्स संदर्भातही पुर्वी कोणाचेही मत न घेता कमिटी स्थापन करण्यात आली होती, ती सुध्दा कमिटी बरखास्त करणेत यावी. व नवीन समिती नेमण्यात यावी.

मा.प्रभाग समिती सभेचे दिवशी इतर कुठली सभा आयोजित केली असता, प्रभाग समिती सभेसाठी अधिकारी उपस्थित राहत नाहीत, अशा वेळी सदर सभा घेण्याचा काहीही उपयोग होत नाही. मा.आयुक्त यांना पत्राव्दारे कळविणेत यावे की, सदर सभेचे दिवशी ग क्षेत्रिय कार्यालयाशी सबंधित अधिकारींचे संदर्भात मिटींग आयोजित करणेत येऊ नये.

मा.आमदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार काम झाले का?

## (आरोग्य विभाग )

**मा.सचिन भोसले –** जे ठेकेदार नीट काम करत नाही, त्यांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाका.
**(प्रभाग क्र.२४)** वेळापत्रकानुसार औष्णिक धुरीकरणाच्या गाडया येत नाहीत. औषध फवारणीचे कामसुध्दा वेळेवर होत नाही, यासंदर्भात सर्व माहिती द्या.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) -** धुरिकरणाचे काम दुस-या ठेकेदाराला देण्यात आले आहे.

**मा.संदिप वाघेरे -** प्रभाग क्र.२१ येथे टॉयलेट बाथरुम तुंबलेय..दैनंदिन स्वच्छता केली जात नाही.

**मा.सचिन भोसले -** सहा ते सात महिन्यांपासुन पत्र देऊनही कामे होत नाही. कामासाठी माणसे नाहीत असे उत्तर दिले जाते. दीड महिन्यात माणसे वाढवुन काम सुरु करा. योग्य त्या संस्था नेमण्यात याव्या.

**मा.सविता खुळे -** (प्रभाग क्र.२७)साफसफाई करीता आस्थापनेवरील कायमस्वरुपी नेमलेले कर्मचारी येत नाहीत. केवळ कागदोपत्री कामासाठी माणसे आलेली दिसतात. त्यांचेवर काय कारवाई केली याची माहिती द्या.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) –** सदर कर्मचा-यांना दंड करण्यात आला आहे.

**मा.सविता खुळे –** (प्रभाग क्र.२७) कचरा गाडी रोज येत नाही, झाडु वाले येत नाहीत, टॉयलेट बाथरुम साफ नसतात, अशा सर्व समस्या आहेत. सफाई कर्मचारी वाढवण्यात यावे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** कर्मचारी कुठे कमी पडतात याची सविस्तर माहिती देणेत यावी.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) -** मुख्य कार्यालयास डिमांड दिलेली आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** आतापर्यंत कर्मचारी का देण्यात आले नाही, किती दिवसात कर्मचारी देणार ते सांगा.

**श्री.देशपांडे (सहा.आरोग्य अधिकारी) -** पत्र मिळालेले आहे त्यानुसार त्यावर कारवाई सुरु आहे. सध्याच्या कामाची माहिती देण्यात आली आहे. १ महिन्यात कारवाई करु.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** सतत गैरहजर राहणा-या लोकांची यादी देण्यात यावी.

## अतिक्रमण विभाग

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** अतिक्रमण कारवाई ग प्रभागात कुठे करण्यात आली.

**श्री.सावंत (अतिक्रमण विभाग प्रमुख)-** शगुन चौक ते डीलक्स चौक एकुण १६ हातगाडया उचलण्यात आल्या. डांगे चौक, रहाटणी फाटा, नखाते वस्ती येथे गाडया उचलल्या. नखाते वस्ती येथे २९ तारखेला कारवाई केली.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** नखाते वस्ती, रहाटणी, रहाटणी फाटा, रहाटणी गाव, तापकीर नगर बसस्टॉप, शिवाजी महाराज पुतळा परिसर, येथे बस स्टॉपला अजुनही गाडया लागलेल्या असतात. अशा प्रकारे कशी कारवाई करण्यात आली. पुन्हा लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी.

**मा.संदिप गाडे –** १६ नंबर बसस्टॉप ते थेरगाव या दरम्यान ब-याच हातगाडया आहेत. तिकडे कारवाई होत नाही. लवकरात लवकर तेथे अतिक्रमण कारवाई करण्यात यावी, जेणेकरुन सदर रोड वाहतुकीसाठी मोकळा होईल.

**मा.सचिन भोसले –** अतिक्रमणासाठी असलेल्या एकुण कर्मचा-यांची माहिती देण्यात यावी.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** यानंतर पुन्हा कारवाई कधी आहे ?

**मा.चंद्रकांत नखाते –** अतिक्रमण कारवाई साठी असलेल्या गाडीला माईक लावणेत येऊन ती गाडी फिरली पाहिजे.

**श्री.बाबासाहेब गलबले (कनिष्ठ अभियंता विद्युत)** - लवकरात लवकर गाडीला माईक लावणेची व्यवस्था करण्यात येईल.

**मा.संदिप गाडे –** अतिक्रमण गाडयांना GPRS System बसवा.

## पाणीपुरवठा विभाग

**मा.सविता खुळे –** प्रभाग क्र.२७ मध्ये कमी प्रेशरने पाणी येते. जयहिंद कॉलनी, यशदा, मधुसुदन, पोलिस कॉलनी, या भागात पाणी कमी प्रमाणात येते. टाक्या पुर्ण भरत नाहीत. अमरदीप परिसराचीहि तक्रार आहे. पाणीपुरवठा विस्कळीत आहे.

**श्री.साबळे (उपअभियंता, पाणीपुरवठा)** - कुणाल हॉटेल या भागात १६०एम एम व्यासाची पाईप लाईन टाकणेचे काम सुरु आहे. अमृत योजनेची कामे लवकर सुरु होतील

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** तापकिर नगर येथे भाऊंच्या हस्ते पाईपलाईनचे उदघाटन झाले असुनही अजुन काम झालेले नाही.

**श्री.साबळे (उपअभियंता, पाणीपुरवठा) –** काम चालु केले होते पण खाली सर्व खडक लागल्यामुळे काम थांबवले आहे. हॅण्ड ब्रेकर लावावा लागेल. उद्या काम चालु करु.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** एका ठिकाणी खडक लागला असल्यास दुस-या ठिकाणाहुन काम सुरु करा.

**मा.मनिषा पवार –** श्रीनाथ कॉलनीतही पाण्याची समस्या आहे.

**मा.संदिप गाडे –** ज्या ठिकाणी पाण्याच्या समस्या अधिक आहेत, तेथे काम सुरु करण्यात यावे.

**मा.कैलास बारणे -** ज्या प्रभागात काम करण्यात येते, तेथील नगरसदस्यांना सदर ठिकाणी बोलवण्यात यावे.

## उद्यान विभाग

**मा.सचिन भोसले –** उद्यान विभागाकडे झाडे उपलब्ध नाहीत असे कितीतरी वेळा ते सांगतात. पालिकेचे उद्यान रोप तयार करण्यासाठी आहेत.. तरीही बाहेर कॉन्ट्रॅक्ट दिले जातात. झाडे लावली जात नाहीत. रोप देऊ शकत नाहीत किंवा झाडे उपलब्ध नाहीत असे उद्यान विभागाने लेखी द्यावे. उद्यान विभागाला इतर कुठले काम आहे याची माहिती द्यावी.

**श्री.बी.के. तापकीर (उद्यान सहाय्यक)–** ठेकेदाराविरुध्द ३ ते ४ वेळा हेड ऑफिसला पत्रव्यवहार केलेला आहे. ३५० झाडे लावुन झाली.

**मा.सचिन भोसले –** संतोष नगर, बेल्ठीका पार्क येथे झाडे लावले नाहीत. राडारोडा हा रस्त्यांवर पडलेला असतो याबाबत कार्यवाही करावी.

**मा.चंद्रकांत नखाते -** प्र.क्र.२७ रहाटणी येथील संभाजी उद्यान येथे लॉन मध्ये हरळी ऐवजी २ पानांचे गवत उगवले आहे. तेथील वाढलेली झाडे काढलेली नाहीत.

**मा.सचिन भोसले -** (प्रभाग क्र.२४ लक्ष्मीबाई बारणे उद्यान )टाकीच्या वरचा भाग ओपन असल्याने ते अतिशय धोकादायक आहे सदर भाग लवकरात लवकर बंद करण्यात यावा. गार्डनमध्ये सुरक्षा व्यवस्था नसल्याने त्या ठिकाणी गैरप्रकार घडु शकतात. तेथे लवकरात लवकर भिंतीचे कंपाऊंड बांधणेचे काम सुरु करा. गार्डनमधील लॉन खराब झाले आहे.

प्रभाग समिती मिटींगचे दिवशी इतर कुठल्या मिटींग असल्यास प्रभाग समिती मिटींग अथवा इतर कुठल्याही मिटींगचे आयोजन करु नये.

## विद्युत विभाग

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** डी मार्ट समोरील भुयारी मार्गात सी सी टी व्ही बसविण्याबद्दल काय कारवाई केली.

**श्री सतिष तायडे (कनिष्ठ अभियंता)–** डीमार्ट समोरील भुयारी मार्गाची उंची कमी असल्याने तेथे सी सी टी व्ही लावता येत नाही.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** सदर भुयारी मार्गाच्या बाहेर येतांना व जातांनाच्या मार्गावर कॅमेरा बसवण्यात यावा.

**मा.सचिन भोसले –** प्रभाग क्र.२४ मध्ये किती LED दिवे बसविण्यात आले ?

**श्री सतिष तायडे (कनिष्ठ अभियंता)–** बिरला हॉस्पिटल रोडला १३५ wat चे LED दिवे बसवले, हे एलईडी दिवे कॉलनीत बसवले जात नाहीत. स्टोअरमधुन मिळालेले दिवे बसविण्यात आले आहे.

**मा.सचिन भोसले –** स्टोअरचे डिटेल्स द्या. जेवढे पोल्स तेवढे एलईडी हवे.
महानगरपालिकेच्या शाळेत टयुबलाईट नाही तेथे लवकरात लवकर लाईट्स बसविण्यात यावे.

**श्री सतिष तायडे (कनिष्ठ अभियंता)** – गोडाऊन मधुन मिळाल्यावर दिवे बसविणेत येतील.

**मा.सचिन भोसले –** मंगलनगर मध्ये ३ गल्ल्यांमध्ये एलईडी नाही. विद्युत विभागास एक खांब शिफ्ट करण्यास सां गितले होते तेही काम झालेले नाही. एलईडी कधी बसवुन मिळतील, ते सांगा.याबाबतीत श्री गलबलेंनी माहिती द्यावी. प्रभाग क्र.२३ व २४ मधील विद्युत खांबांची मोजणी करा. प्रत्येक गल्ली नुसार, कॉलनी नुसार माहिती द्या. सुरुवातीला मेंटेनंन्सचे काम क्लीअर करा. किती बदलणे गरजेचे आहे याची माहिती घ्यावी.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** श्री.गलबले यांनी याप्रकरणात लक्ष द्यावे. जे अधिकारी काम करत नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

**मा.कैलास बारणे –** जेथे कचरा संकलन केले आहे, तेथेच कचरा गाडया लावण्यात याव्या. तिकडे लवकरात लवकर लाईट्स लावावे. इकडे पार्क केलेल्या कचरागाडया तिकडे शिफ्ट करा.

**मा.संदिप गाडे -** गुजर नगर सबवे येथे डुकरांचे प्रमाण अधिक आहे. सदर ठिकाणी कचरा टाकु नये असे बोर्ड स्थापत्य विभागाने लावण्यात यावे.
डांगे चौक ते काळेवाडी फाटा खड्डे बुजविण्यात यावे. १ आठवडयाच्या आत काम करण्यात यावे.

**मा. सचिन भोसले –** मंगलनगर शाळेत १९ मुलांना गणवेश नाही, गैरहजर असलेल्या मुलांना गणवेश मिळालेले नाहीत. याबाबत कार्यवाही करावी.

**मा.संदिप गाडे -** मनपाच्या शाळांमध्ये अनेक वेळा विविध कार्यक्रम होतात, मा.महापौर सदर कार्यक्रमांस उपस्थित असतात, परंतु या कार्यक्रमांची वेळ नगरसदस्यांना कळविली जात नाही, यापुढे शाळांमधुन कार्यक्रमांसंदर्भातील निमंत्रण पत्रे नगरसदस्यांना देण्यात यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीस “**सिंधुदुर्ग प्रभाग समिती**” व ग क्षेत्रिय कार्यालयास **“सिंधुदुर्ग क्षेत्रिय कार्यालय”** असे नाव देण्यास मान्यता देण्यात आली.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/     /२०१८
दिनांक -     /१०/२०१८

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात  वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही